1089

# Slum Rehabilitation Authority, Pune

APPENDIX D-1

SANCTION OF BUILDING PERMISSION

AND COMMENCEMENT CERTIFICATE

लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act
आपली सेवा आमचे कर्तव्य

Building Permit No - 1515504
Proposal Code : SLRAP-25-39901

Permit No. : SLRAP/B/2025/APL/00002
Date : 09/06/2025

| Building Name : | COMPOSITE BUILDING(Mixed) | Floors : | LOWER GROUND FLOOR ,UPPER GROUND FLOOR ,FIRST FLOOR ,SECOND THIRD FOURTH FIFTH SIXTH SEVENTH NINTH TENTH ELEVENTH TWELEVETH FLOOR PLAN,EIGHTH AND THIRTEEN FLOOR PLAN |
|---|---|---|---|

To,
i)Sahyadri Properties,
C.T.S. NO.219, 220/1, 220/2, 220/3, 220/4A, 220/4B, 221, 222/A, 222/B, 223, 233 & 234 GURUWAR PETH , PUNE.
ii) Junaid Sayyed (Architect)

**Sir/Madam,**

With reference to your application No **SLRAP202500006**, dated **10-05-2025** for the grant of sanction of Commencement Certificate under Section 18/44 of The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 read with - , to carry out development work / Building on Plot No -, City Survey No./Survey No./Revenue S.No./Khasra No./Gut No. **C.T.S. NO.219, 220/1, 220/2, 220/3, 220/4A, 220/4B, 221, 222/A, 222/B, 223, 233 & 234**, Final Plot No. -, Sector No. -, Mouje **GURUWAR PETH** situated at Road / Street -, Society - . The Commencement Certificate / Building Permit is granted under Section 18/45 of the said Act, subject to the following conditions :

1. The land vacated in consequence of the enforcement of the set back line shall form part of the public street.
2. No new building or part thereof shall be occupied or allowed to be occupied or permitted to be used by any person until Occupancy permission has been granted.
3. The Development permission/Commencement Certificate shall remain valid for a period of one year commencing from the date of its issue.
4. This permission does not entitle you to develop the land which does not vest in you.
5. This permission is being issued as per the provisions of UDCPR. If any permission is required to be obtained from any department of the state or central government under the provisions of any other laws / rules , it shall be binding on the owner/ developer to obtain such permission from the concerned authority.
6. Information Board to be displayed at site till Occupation Certificate.
7. If in the development permission reserved land/amenity space/road widening land is to be handed over to the authority in the lieu of DEVELOPMENT RIGHTS if any, then necessary possession receipt, registered transfer deed alongwith change in name on record of rights shall be executed in the name of authority with in 6 month from the commencement certificate.
8. All the provision mentioned in UDCPR,as may be applicable, shall be binding on the owner/developer.
9. Provision for recycling of Gray water ,where ever applicable shall be completed prior to completion certificate and design, drawing with completion certificate shall be submitted along with the application for occupancy certificate.
10. Lift Certificate from PWD should be submitted before Occupation Certificate, if applicable.
11. Permission for cutting of tree, if necessary, shall be obtained from the tree authority. Also the certificate/letter for plantation of trees on the land, if required under the provision of tree act, shall be submitted before occupation certificate.
12. All guidelines mentioned in the environment and forest climate change department, Govt. of Maharashtra, letter no CAP-2023/CR-170,TC-2, shall be followed, if applicable

Assistant Director Town Planning,
Slum Rehabilitation Authority, Pune,

Scan QR code for verification of authenticity.

Signature valid

Digitally signed by HRISHIKESH V[illegible]GHATE
Date: 2025.06.09 18:34:31 IST
Reason: Approved Certificate
Designation : Assistant Director Town Planning
Location: Slum Rehabilitation Authority, Pune
Project Code : SLRAP-[illegible]
Application Number : SLRAP202500006
Proposal Number : 1515504
Certificate Number : SLRAP/B/2025/APL/00002

## अटी/शर्ती

१. विषयांकीत जमिनीचे मालकी हक्काबाबत व इतर कोणत्याही हक्काबाबत, वहिवाटीबाबत, चतु:सिमेबाबत, विवाद किंवा न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित विकसक यांची राहील.

२. योजनेतील पुनर्वसन क्षेत्रासाठी सिमांकीत करावयाच्या भूखंडाच्या हद्दीनुसार किमान १.५ मी उंचीची सिमाभिंत बांधणे बंधनकारक आहे. ज्या भूखंडावर नवीन इमारत बांधण्यात येणार आहे त्या इमारतीचे भोगवटापत्र मागण्यापूर्वी विकसकाने इमारतीसमोर सिमाभिंतीच्या (कंपाऊंड वॉल) आत वृक्ष संवर्धन अधिनियम, १९७५ मधील तरतूदींनुसार वृक्षारोपण करून ती व्यवस्थीत वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था व खबरदारी घ्यावी. रस्त्यावरील झाडांना जरुर त्या संरक्षक कुंपणाची उभारणी करावी. योजना क्षेत्रातील बांधकामासाठी झाडे तोडणे आवश्यक असल्यास त्यावर योग्य त्या सक्षम प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३. कामगारांच्या सोयीसाठी जागेवर तात्पुरत्या स्वरुपाच्या किमान पुरेशा स्वच्छता गृहाची सोय करणेची, तसेच कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक व्यवस्था करणेची जबाबदारी विकसकाची राहील. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ व त्याअंतर्गत नियमाचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

४. सदर प्रकरणी मंजूर करण्यात आलेल्या ले-आऊट नकाशा / बांधकाम नकाशा वरील दर्शविलेल्या दुरूस्त्या / अटी / शर्ती बंधनकारक राहतील.

५. जोत्याचे बांधकाम पूर्ण झालेनंतर वास्तुविशारदाचे प्रमाणपत्र विहित नमुन्यात सादर केल्यानंतर व यासंदर्भात जोते बांधकाम प्रमाणपत्र प्राधिकरणाकडून अदा केल्यानंतरच पुढील बांधकाम करणेत यावे.

६. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ व झो.पु.प्रा. पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्रासाठी लागू असलेली विकास नियंत्रण नियमावली, तसेच शासनाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देशानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांचे मान्यतेने याप्रकरणी आवश्यक त्या शर्ती व अटी वेळोवेळी निर्देशित करण्याचे अधिकार झो.पु.प्रा. कार्यालयास राहतील. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेली तसेच या संदर्भात भविष्यात जारी होणारी परिपत्रके / आदेश विकसकावर बंधनकारक राहतील.

७. पर्यावरणाशी संबंधित अधिनियमांचे अनुषंगाने आवश्यक ती पुर्तता करणे विकसकावर बंधनकारक राहील, तसेच इको हौसिंग बाबत सर्व मानके व अटी बंधनकारक राहतील.

८. सदर जागेतून पाण्याचा नैसर्गिक निचरा होण्याचा मार्ग जात असल्यास तो संबंधित म.न.पा.च्या परवानगीशिवाय बंद करू नये अथवा त्याचा मार्ग बदलण्यात येवू नये.

९. प्रस्तावातील बांधकामासाठी Rain Water Harvesting करुन पावसाचे पाणी साठविणे व त्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक राहील, तसेच सांडपाण्यावर प्रक्रिया (Recycling) करणे आवश्यक राहील.

१०. सांडपाणी विल्हेवाट (sewage treatment) पर्यावरण / प्रदुषण नियंत्रण विभागाकडील सुचनेनुसार पार पाडणे बंधनकारक राहील.

११. घन कचरा व्यवस्थापन (Solid Waste) विल्हेवाटीसाठी ओला कचरा/सुका कचरा याचे नियोजन/ वर्गीकरण करणे व त्यासंदर्भात स्थानिक प्राधिकरणांच्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१२. Solar equipment बसवण्याची व्यवस्था महाऊर्जा विभागाकडील तसेच प्रधीकरानाकडील सूचनांनुसार करण्यात यावी, व तसे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

१३. बांधकाम साहित्यात पर्यावरण पूरक (Environment friendly) साहित्य, जसे की फ्लाय ॲश विटा इत्यादींचा वापर करणे बंधनकारक राहील.

१४. बांधकाम परवानगीसाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे आढळून आल्यास दिलेली बांधकाम परवानगी आपोआप रद्द होईल. बांधकाम नकाशातील सादर केलेल्या आकडेवाडी संदर्भात तफावत / दुरूस्त्या अगर चूक आढळल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही विकसक व वास्तुविशारद यांची राहील.

१५. प्रस्तुत बांधकाम परवानगीचे अनुषंगाने विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास फरकाची रक्कम त्वरीत भरणे विकसकावर बंधनकारक राहील. तसेच या संदर्भात विविध शुल्काबाबत शासनाकडून / प्राधिकरणाकडून वेळोवेळी होणारे बदल बंधनकारक राहतील, याची नोंद घ्यावी.

१६. नकाशात दाखविलेल्या नियोजनामध्ये प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही बदल करु नये. तसेच इमारती बांधकाम करतानाची देखरेख (Supervision) हे सुशिक्षित तज्ञ अभियंत्यामार्फत करणेची व गुणवत्ता नियंत्रणाची (Quality Control) जबाबदारी संपूर्णपणे विकसक/ वास्तुविशारद यांची राहील.

१७. प्रस्तुत बांधकाम / विकास परवानगी मिळाल्यानंतर परवानाधारक / भूखंडधारक यांनी जागेवर झो.पु.प्राधिकरण असा ठळक/मोठ्या अक्षरात उल्लेख करून खालील प्रमाणे माहिती दर्शविणारा फलक लावावा.

अ. भूखंडधारकाचे / परवानाधारकाचे (विकसक / वास्तु विशारद) नाव व पत्ता.

ब. भूखंड क्रमांक त्याच्या हद्दी व सभोवतालची माहिती.

क. बांधकाम आरंभ प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक

ड. एकूण मंजूर बांधकाम क्षेत्र / मजले.

१८. विकसकाने भोगवटा प्रमाणपत्र घेण्यापूर्वी महानगरपालिकेच्या जल नि:सारण विभाग ,मल नि:सारण विभाग, अग्निशमन विभाग , पाणी पुरवठा विभाग ,उद्यान (वृक्ष संवर्धन ) विभाग , तसेच अन्य संबंधित विभाग यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्र बांधकाम नकाशांसह सादर करावे. त्याचप्रमाणे महसूल विभागाकडून गौणखनिज उत्खननाची परवानगी तसेच स्वामित्वधन रक्कम शासनास जमा केलेबाबतचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.

१९. पुनर्वसन / विक्री घटक इमारतीमधील Refuge area क्षेत्र बंद करणे अनुज्ञेय नाही व ते कायमस्वरूपी खुले ठेवावे.

२०. बेसमेंटचा वापर Not for habitation purpose व केवळ परवानगी प्राप्त वाहनतळासाठी अनुज्ञेय आहे. मात्र, सदर क्षेत्रात रहिवासी / व्यापारी वापर प्रतिबंधीत राहील. आवश्यक असल्यास बेसमेंटसाठी पुरेशा प्रमाणात वायू विजनाची सोय नैसर्गिकरित्या अथवा कृत्रीम पद्धतीने करणे बंधनकारक राहील, तसेच इमारतीमधील प्रस्तावित रॅम्पचा उतार कमाल १:१० इतका असणे आवश्यक राहील. सदरहू बेसमेंट वापरण्याबाबत उल्लेख फलकावर ठळक अक्षरात नमूद करण्यात यावा.

२१. आपत्कालीन व्यवस्थापन अधिनियमातील तरतूदींनुसार प्रस्तावित बांधकाम हे भूकंप विरोधक (Earthquake Resistant) पध्दतीने होईल, याची संपूर्ण जबाबदारी ही विकसक / वास्तुविशारद यांची राहील. याबाबत Structural Designer यांचे प्रमाणपत्र हे जोते तपासणी पूर्वी सादर करण्यात यावे.

२२. फायर एस्केप जिना (Safety stop door सह) बाहेरील बाजूस उघडेल याची दक्षता घेण्यात यावी, तसेच इमारतीमधील प्रस्तावित लॉफ्टची उंची अनुज्ञेय मर्यादेत ठेवण्यात यावी.

२३. इमारतीमधील पुरेशा उजेड व वायुवीजन संदर्भातील आवश्यक त्या नियोजनाची संपूर्ण जबाबदारी योजनेचे वास्तुविशारद व विकसक यांची राहील. इमारतीमधील कुठलेही क्षेत्रमध्ये दिवसा अंधार राहणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

२४. विक्री घटक इमारतीसाठी स्थावर संपदा अधिनियम, २०१६ (RERA ACT) मधील सर्व तरतुदी बंधनकारक राहतील.

२५. योजनेच्या रेखांकनातील रस्ते, खुली जागा सार्वजनिक वापराचे वाहनतळ इमारतीतील सर्व रहिवाशांसाठी समान तत्त्वावर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

२६. मंजूर विकास योजनेतील रस्त्याखालील क्षेत्र तसेच आरक्षणांतर्गत क्षेत्र अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मागणीपूर्वी संबंधित मनपाकडे हस्तांतरीत करणेत यावे.

२७. दिव्यांग व्यक्तीसाठी (Differently Abled persons) साठी आवश्यक त्या सोयी सुविधा बांधकामामध्ये उपलब्ध करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी विकसक व वास्तुविशारद यांची राहील.

२८. सदरच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील समाविष्ट होणाऱ्या झोपडीधारकांची सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना/नोंदणी करण्यासाठीचा प्रस्ताव ३० दिवसांमध्ये सादर करण्यात यावा. भोगवटा प्रमाणपत्रानंतर अशा प्रकारे स्थापन होणाऱ्या सह.गृहनिर्माण संस्थेकडे प्रस्तावातील नमूद खाजगी जमीन विक्री संलेख करून सरकारी जमीन ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने हस्तांतरीत करणे आवश्यक राहील.

२९. सिमाभिंत / संरक्षक / प्रतिधारक भिंत ही तज्ज्ञ आर.सी.सी सल्लागाराकडून प्रचलित भारतीय मानके (आय.एस.४५६-२०००, आय.एस.१४४४८-१९९८) व अनुषंगिक इतर मानकांमधील तरतुदीनुसार डिझाईन करून घेवून भारत राष्ट्रीय भवन निर्माण संहिता (नॅशनल बिल्डिंग कोड) मधील तरतुदीनुसार तज्ज्ञ सल्लागाराचे देखरेखीखाली उभारण्यात याव्यात. सिमाभिंत आरसीसी फ्रेम स्ट्रक्चर मध्ये व संरक्षक / प्रतिधारक भिंत ही आरसीसी मध्येच इमारत विकसनाचे कोणतेही काम करण्यापूर्वी बांधण्यात याव्यात. तसेच लगतच्या बांधकाम / विकसनाचा विचार करून सदर मिळकतीचे तळघराचे कामाचे स्ट्रक्चरल कन्सलटंट कडून डिझाईन ड्रॉईंग घेवून काम करण्यात यावे.

३०. प्रस्तुत प्रकरणी इमारतीची बहुमजली उंची विचारात घेता Aviation Authority Pune तसेच संरक्षण विभागाकडील N.D.A चे C.C.Z Map मधील कलर कोडिंग नुसार निर्धारित केलेल्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

३१. योजनेतील प्रत्येक इमारतीच्या बाहेरील बाजूचा (सामासिक अंतरामधील) एक मी. रूंदीचा समांतर भाग paved असणे बंधनकारक राहील.

३२. आर.सी.सी. व वीट बांधकाम पूर्णत्वापोटीचा टी.डी.आर. मागणीपूर्वी विषयांकित योजनेतील एक पुनर्वसन रहिवासी गाळा Sample Flat म्हणून पाहणीसाठी पूर्ण करणे विकसकावर बंधनकारक राहील.

३३. पिण्याचे पाणी/वापरावयाच्या पाणी टाकीचे नियोजन सुयोग्य आकारमानाचे करावे आणि इमारत निहाय पुरेशी व स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.

३४. परिपत्रक क्र. ०६/२०२४ दि. ०२/०९/२०२४ नुसार विषयांकित योजना बांधकाम परवानगी प्राप्त झाले पासून ४८ महिन्यात पूर्ण करणे विकसकावर बंधनकारक राहील.

३५. पार्किंग, जिना, पॅसेज, व लिफ्ट इ. करिता स्वतंत्र विद्युत मिटरची व्यवस्था सह.गृहरचना संस्थेच्या नावे करण्यात यावी.

३६. पुणे महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाकडील दि.२१/०५/२०२५ रोजीच्या Provisional Fire NOC मधील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणे विकसकावर बंधनकारक राहील.

३७. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ नुसार महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.मइवाधो-२०२१/प्र.क्र.२५/ता.क्र.४ नुसार इलेक्ट्रिक वाहन चार्जिंगसाठी जागा उपलब्धता करून देणे बंधनकारक राहील.

३८. विकसकाने शासनाला / प्राधिकरणाला / महापालिकेला देय असलेले कर व इतर रक्कम वेळच्या वेळी भरणा करणे अनिवार्य असेल.

३९. सदर प्रकल्पाचे बांधकाम झो.पु.प्रा.ने निश्चित केलेल्या मानकांप्रमाणे (कार्यालयीन परिपत्रक क्र. १३१ दि. १३/२/२०१४ तसेच वेळोवेळी दिलेल्या सूचना विचारात घेऊन) विहीत मुदतीत पूर्ण करणे विकसकावर बंधनकारक राहील. प्रकल्पाचे स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी, बांधकामात वापरण्यात येणा-या साहित्यांची

गुणवत्ता तसेच बांधकामाचा दर्जा याबाबत कसलीही तडजोड न करता विनिर्देशाप्रमाणे बांधकाम करणेची सर्व जबाबदारी विकसक/ वास्तुविशारद/ स्ट्रक्चरल इंजिनिअर यांची राहील.

४०. भविष्यात पात्र ठरणा-या तसेच अपात्र झोपडीधारकांचे संदर्भात उपलब्धेप्रमाणे सशुल्क पुर्नवसनासाठी आवश्यक त्या उर्वरित गाळ्यांविषयी बांधकाम करणे आवश्यक होईल याबाबतची पडताळणी करण्यात यावी. त्यानुसार योजनेमध्ये समाविष्ट इमारतींच्या RCC संरचनेत / स्ट्रक्चरल डिझाईनमध्ये संभाव्य वाढ होणाऱ्या बांधकामासंदर्भातील व्यवस्था / तरतूद करणे विकसक /वास्तुविशारद यांचेवर बंधनकारक राहील.

४१. **शासनाच्या गृहनिर्माण व नगररचना विभागाकडून तसेच सर्व सांविधानिक प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या सर्व निर्देशांच्या / सूचनांच्या अधिन राहून सदर बांधकाम / विकास परवानगी मंजूर करणेत येत आहे व त्यामध्ये वेळोवेळी आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना राहतील.**

सदर योजनेकरीता वरील नमूद कोणत्याही अटी / शर्तीचा भंग झाल्याचे आढळल्यास प्रस्तुतची बांधकाम परवानगी रद्दबातल ठरविण्यात येऊन विकसक / वास्तुविशारद/ स्ट्रक्चरल इंजिनिअर यांच्यावर म.प्रा.नि.व न अधिनियम १९६६ मधील तसेच इतर अनुषंगिक अधिनियम / नियम यामधील तरतुदींनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल,याची नोंद घ्यावी.

**सोबत झोपु योजनेच्या संदर्भातील विकास परवानगी संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन** अधिनियम १९६६ मधील कलम ४५ नुसार तसेच **झोपुप्रा विशेष नियमावलीतील नियम क्र. ४(५) नुसार मंजूर योजनेच्या अधीन राहून बांधकाम नकाशे** मंजूर करण्यात येत आहेत.

सहाय्यक संचालक नगर रचना,
झो.पु.प्रा. पुणे.

जा.क्र. झोपुप्रा/तां१/मास्टर क्र.२९१/२०२५
दिनांक - ०९ /०६ /२०२५



c:\users\ttechnical\desktop\rewise cc.docx